Peer reviewed Journal Impact Factor: 7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

***A Multidisciplinary International Level Referred Journal***

**July 2021 Volume-11 Issue-27**



## *Impact of Environment on Agriculture, Health, Water Resources, Social Life & Industrial Development*




**Chief Editor**
**Dr. R. V. Bhole**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot
No-23, Mundada Nagar, Jalgaon


| Executive Editors | Executive Editors | Executive Editors |
|---|---|---|
| **Dr. M. N. Kolpuke**<br>Principal,<br>Maharashtra Mahavidyalaya, Nilanga | **Dr. S. S. Patil**<br>Principal,<br>Maharashtra College of Pharmacy, Nilanga | **Dr. E. U. Masumdar**<br>Principal,<br>Azad Mahavidyalaya, Ausa |

Co- Editors

Dr. B. N. Paul, Dr. C.J. Kadam, Prof. T. A. Jahagirdar, Dr. Naresh Pinamkar
Dr. C. V. Panchal, Dr. Nisar Syed, Mr. Santosh P Mane









**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

## CONTENTS


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1. | "पर्यावरण संवर्धन काळाची गरज"<br>प्रा. डॉ.अंभुरे एस. डी. | 1-3 |
| 2 | वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शारीरिक शिक्षणविषयक अभिवृत्तीचा चिकित्सक अभ्यास<br>श्री सावळे शरद अरुण | 4-7 |
| 3 | छत्रपती शिवाजी महाराजांची जल व्यवस्थापन पद्धती – एक अभ्यास<br>Dr. Ladaf S.K | 8-10 |
| 4 | दुष्काळ आणि शेतकरी आत्महत्या : विशेष संदर्भ शेतकरी दीर्घकाव्य<br>प्रा डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे | 11-13 |
| 5 | रवींद्र शोभणे यांच्या साहित्यात पडलेले दुष्काळाचे प्रतिबिंब आणि आजचे वास्तव<br>प्रा. डॉ. सुनिल भावराव देसले | 14-17 |
| 6 | "जलसंबंधित ग्रामीण अर्थव्यवस्था आणि विकास"<br>प्रा. डॉ. खिस्ते ओंकार बाळकृष्ण | 18-20 |
| 7 | "भारतीय शेती विकासाचा अभ्यास"<br>डॉ. राजाराम महादेव थोरात | 21-25 |
| 8 | चंदगड तालुक्यातील जलव्यवस्थापनाचा इतिहास<br>Dr.Madhukar Vithoba Jadhav | 26-29 |
| 9 | लोकसंख्येचा विस्फोट पर्यावरणाच्या -हासाला कारणीभूत<br>डॉ. कविता मते | 30-32 |
| 10 | पर्यावरण संवर्धन : काळाची गरज<br>प्रा. डा. हेमचंद दुधगवळी | 33-34 |
| 11 | कोविड — 19 का भारतीय अर्थव्यवस्था पर प्रभाव<br>प्रा. मोरेश्वर भिकाजी शेन्डे | 35-38 |
| 12 | ग्रामीण विभागातील कृषी विकासाचा चिकित्सक अभ्यास<br>डॉ. राजेंद्र तुळशीदास आहिरे | 39-42 |
| 13 | दुष्काळजन्य परिस्थिती चे साहित्यातील चित्रण<br>विकास नामदेव लोडे | 43-46 |
| 14 | जलव्यवस्थापन काळाची गरज<br>डॉ. डी. एम. कदम | 47-50 |
| 15 | चळवळी आणि हिंदू तत्वज्ञान यांची सांस्कृतिक व राजकीय चर्चा करणारा मौलिक ग्रंथ'<br>प्रा. डॉ. हंसराज दत्तात्रय भोसले | 51-53 |
| 16 | पर्यावरण आणि समाज<br>प्रा. डॉ. मंगला कडवे | 54-56 |
| 17 | जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा - जिल्हा रायगड ही एक रायगड जिल्ह्यातील बचत गटांना प्रोत्साहित करणारी संस्था<br>प्रा. शत्रुघ्न नामदेव लोहकरे, प्रा. डॉ. मनीषा कर्णे | 57-59 |
| 18 | भारतातील कृषि आणि जलसिंचन सुविधांचा आढावा<br>पांचाळ विजय किशनराव | 60-62 |
| 19 | नागपूर शहर में अपशिष्ट जल प्रबंधन; धारणीय विकास की ओर एक पहल<br>स्वाती रमेश भोवते, डॉ.अविनाश व. तलमले | 63-67 |
| 20 | "जल प्रदूषण आणि मानवी आरोग्य"<br>प्रा.डॉ.अनिल निवृत्ती शिंदे | 68-72 |
| 21 | शेतकरी आत्महत्या व समाजकार्य कर्त्यांची भुमिका<br>डॉ. मनोज श्रीकृष्णराव पवार | 73-76 |
| 22 | शेतक-यांच्या समस्या आणि शेती विकास एक विश्लेषणात्मक अध्ययन<br>प्रा.डॉ. प्रशांत रा. देशमुख | 77-81 |
| 23 | चंद्रपूर परिसरातील कोळसा खाणिचा स्थानिक पर्यावरणावर होणारा परिणाम<br>अमोल काशीनाथ बावने, मनिषा दूधराम ठवरे | 82-84 |
| 24 | पर्यावरण संवर्धनात आदिवासींचे योगदान<br>प्रा. डॉ.भास्कर गायकवाड | 85-88 |

# जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा - जिल्हा रायगड ही एक रायगड जिल्ह्यातील बचत गटांना प्रोत्साहित करणारी संस्था

**प्रा. शत्रुघ्न नामदेव लोहकरे[1] प्रा. डॉ. मनीषा कर्णे[2]**

[1]सहाय्यक प्राध्यापक,डॉ. सी. डी. देशमुख कॉमर्स व गौ. के. जी. ताम्हाणे कला महाविद्यालय, रोहा जि.रायगड.

[2]प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग मुंबई विद्यापीठ, मुंबई.

ई-मेल – snlohakare1112@rediffmail.com

**गोषवारा:**

भारतातील ग्रामीण भागाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात अनेक संस्थांचे योगदान आहे. स्वयंसहाय्यता बचत गटांना प्रोत्साहित करणाऱ्या संस्थांही या कार्यात महत्वपूर्ण अशी भूमिका बजावत आहेत. सध्या देशभरात अनेक संस्था अशा प्रकारचे कार्य करतात. आजमितीस या संस्था जिल्हा पातळीवर विकासाचा केंद्रबिंदू आहेत. तेव्हा रायगड जिल्हयातील स्वयंसहाय्यता बचत गटांना प्रोत्साहित करणाऱ्या अनेक संस्थांचे योगदान महत्त्वाचे आहे. या संस्था स्वयंसहाय्यता बचत गटांची स्थापना करून यांच्यामार्फत आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी प्रयत्न करतात. या संस्था स्वयंसहाय्यता बचत गटांतील सदस्यांना पशुपालन, शेळीपालन यासारखे शेतीपुरक व्यवसाय आणि पापड, लोणची बनविण्याचा व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहन देतात. यासाठी प्रशिक्षण, भांडवल आणि बाजारपेठ ही उपलब्ध करून देतात. यामध्ये शासनाच्या अनेक योजनाचा फायदा होतो. या स्वयंसहाय्यता बचत गटांना प्रोत्साहित करणाऱ्या संस्थांमुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गाचा आर्थिक आणि सामाजिक विकास होण्यास मदत होते.

**प्रस्तावना:**

आपल्या देशाचा सर्वांगीण विकास करताना ग्रामीण भागाचा विचार करावा लागतो. याचे कारण आजही देशातील 70 च्या जवळपास लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते. ग्रामीण अर्थव्यवस्था ही शेती आणि शेती आधारीत उद्योगांवर अवलंबून आहे. तसेच भारतातील सर्वांगीण विकासासाठी भारतातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची गरज आहे आणि हे कार्य भारतात स्वातंत्र्योत्तर काळात चालू आहे. अलीकडील काळात विकासाबाबत सर्वसमावेशक विकास या संकल्पनेवर भर दिला जात आहे. यादृष्टीने स्वयंसहाय्यता बचत गटांना प्रोत्साहित करणाऱ्या संस्थांचे कार्य महत्वपूर्ण असेच आहे. भारतात स्वयंसहाय्यता बचत गटांच्या कार्याची, योजनांची अंमलबजावणी करण्यासाठीची यंत्रणा ही त्रिस्तरीय असून हे कार्य केंद्र, राज्य आणि जिल्हा पातळीवर चालत आहे.रायगड जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता बचत गटांना प्रोत्साहित करणाऱ्या संस्थांचे वंचितांच्या विकासाबाबतचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे. यामध्ये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, महिला आर्थिक विकास महामंडळ - रायगड जिल्हा, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अलिबाग- जिल्हा रायगड, अनेक बिगर-शासकीय संस्थां, विविध स्वयंसेवी संस्थां, विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था यांचा समावेश होतो. या संस्था स्वयंसहाय्यता बचत गटांमार्फत अनेक उपक्रम, योजना आणि कार्यक्रमांची अंमलबजावणी करून स्वयंसहाय्यता बचत गटांतील सदस्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे महत्वपूर्ण असे कार्य करतात. यामुळे रायगड जिल्ह्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात वाढ होते. असे कार्य करणाऱ्या कांही प्रमुख संस्था पैकी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा - जिल्हा रायगड ही एक रायगड जिल्ह्यातील बचत गटांना प्रोत्साहित करणारी संस्था म्हणून कार्य करते. तेव्हा या संस्थेचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

**बीज संज्ञा:**

स्वयंसहाय्यता बचत गट, सुक्ष्म वित्त, सर्वसमावेशक विकास, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान.

**उदेश:**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा - जिल्हा रायगड या स्वयंसहाय्यता बचत गटांना प्रोत्साहित करणाऱ्या संस्थेच्या कार्याचा अभ्यास करणे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा - जिल्हा रायगड या स्वयंसहाय्यता बचत गटांना प्रोत्साहित करणाऱ्या संस्थेच्या योगदानाचा अभ्यास करणे.

**विषय विवेचन:**

देशातील स्वयंसहाय्यता बचत गटांना प्रोत्साहित करणाऱ्या संस्था स्वयंसहाय्यता बचत गटांमार्फत अनेक उपक्रम, योजना आणि कार्यक्रमांची आखणी आणि अंमलबजावणी करून स्वयंसहाय्यता बचत गटांतील सदस्यांना